

# पारिजात

॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्थापना : १९९०

खा. बाळासाहेब माने एज्युकेशन ट्रस्ट, रूकडी संचलित

## छ. शिवाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, रूकडी.

IQAC अंतर्गत C.S.C.E.R. चे त्रै-मास वार्तापत्र

नॅक पुनर्मुल्यांकन - ग्रेड सी CGPA 1.84 ISO मानांकन प्राप्त

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - निरंतर संलग्नीकरण व एनसीटीई मान्यता प्राप्त

✻ प्रकाशन काळ - त्रै-मास (१७ नोव्हेंबर २०२५ ते १७ फेब्रुवारी २०२६) ✻




Website : www.csecerukadi.co.in
E-mail - csceo4007rukadi@yahoo.com

प्रकाशन
दि. २४/०३/२०२६

प्रेरणा : मा. खा. डॉ. श्रीमती निवेदिता संभाजीराव माने, मा. श्री. खासदार धैर्यशिल संभाजीराव माने
मा. श्री. वसंतराव रावसाहेब घाटगे, मा. श्री. अमरसिंह काकासाहेब माने

✻ संपादक - प्राचार्य डॉ. ए. व्ही. भोसले, ✻ कार्यकारी संपादक - प्रा. पाटील व्ही. व्ही., प्रा. छाया विवेक चव्हाण, प्रा. स्वाती राजाराम कांबळे

वर्ष ५ वे, अंक ३ रा RNI No. MAHMAR/2023/87536 (Volume :2, Issue :25, Page 4)


✻ संपादकीय मंडळ ✻



प्रा. विशाखा विजय पाटील



प्रा. छाया विवेक चव्हाण



प्रा. स्वाती राजाराम कांबळे



प्रमुख संपादक - डॉ. ए. व्ही. भोसले
छ. शिवाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, रूकडी



मा. खा. श्रीमती डॉ. निवेदिता संभाजीराव माने
अध्यक्ष - खा. बाळासाहेब माने एज्युकेशन ट्रस्ट, रूकडी



खास. धैर्यशिल संभाजीराव माने (प्रवक्ते शिवसेना)
सचिव- खा. बाळासाहेब माने एज्युकेशन ट्रस्ट, रूकडी



प्राचार्य - डॉ. ए. व्ही. भोसले



सीमा चंद्रकांत पेरनुले



दिव्या अतुल गनबावले



शामल संभाजी पाटील



निलम साताप्पा पाटील



स्नेहा नामदेव हिरवे



जुवेरिया मुनीर जमादार



श्रीराज भाऊसाहेब वडार






दि. ४/१२/२०२५ रोजी खासदार बाळासाहेब माने यांच्या स्मृतीदिनानिमित्त संस्थेच्या अध्यक्षा मा. डॉ. श्रीमती निवेदिता सं. माने (वहिनीसाहेब) व सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत पारिजात अंकाचे उद्घाटन करण्यात आले.

## संपादकीय लेख ...

नमस्कार, आज वर्ष पाचवे पारिजात अंक ३ रा संस्थाचालक, सर्व संस्थेचे प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी आणि सर्वात महत्वाचे बी.एड. छात्राध्यापक यांच्या हाती देताना खूप-खूप आनंद होत होत आहे. या आनंदाला दुःखाची झालर आहे आणि ती म्हणजे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. कै. श्री. अजित दादा पवार यांचे झालेले आकस्मिक निधन. अत्यंत दुःखद घटना महाराष्ट्राला बसलेला राजकिय धक्का, त्यातून सावरून महाविद्यालयात दैनंदिन शैक्षणिक व्यवहाराला सुरूवात झाली. ४ डिसेंबर २०२५ कै. बाळासाहेब माने यांच्या पुण्यतिथीचा दिवस त्यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण केली. २३ डिसेंबर ला आपल्या सर्वांचे लाडके ऊर्जास्थान आदरणीय खासदार धैर्यशील संभाजीराव माने यांचा वाढदिवस...त्यांना वाढदिवसाच्या लाख-लाख शुभेच्छा.

यानंतर महाविद्यालयात डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी महिने म्हणजे शैक्षणिक उपक्रमांची रेलचेलच. त्यामध्ये शिवाजी विद्यापिठांतर्गत अग्रणी महाविद्यालयातंर्गत राबविल्या जाणाऱ्या कार्यशाळा म्हणजे शिक्षक-विद्यार्थ्यांना मिळणारी एक मोठी मेजवानीच असते. १२ महाविद्यालयांचे एक क्लस्टर कॉलेज असते त्यामार्फत या कार्यशाळा राबविल्या जातात. तसेच प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना क्षेत्रीय सहभाग, सुटे सरावपाठ व शालेय अनुभव कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. तर द्वितीय वर्षाच्या छात्रांना विविध शैक्षणिक संस्थांना, वस्तुसंग्रहालयाला, बगीचांना, किल्ल्याला भेटी देण्याचे प्रात्यक्षिक अनुभव दिले जातात. हे प्रात्यक्षिक समाजाभिमुख प्रकल्पाअंतर्गत येते तसेच या अंका मध्ये इंदिरा गांधी जयंती, महाराणी ताराराणी पुण्यतिथी, २४ डिसेंबर राष्ट्रीय ग्राहक दिन, संत गाडगे महाराज पुण्यतिथी, स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावरील लेख लिहिण्यात आलेले आहेत. सर्व छात्र-शिक्षकांना आवडणारे प्रात्यक्षिक शैक्षणिक सहल महाबळेश्वर याठिकाणी नेण्यात आली होती. महाराष्ट्राचे काश्मीर अशी त्याची ओळख आहे. संस्कृत भाषेचा विकास व्हावा यासाठी सुभाषिते व त्याचा मराठीत अर्थ देवून परिचय करून दिला जातो. या तीन महिन्यात येणारे छात्र-शिक्षकांचे वाढदिवस शुभेच्छा देवून साजरे केले जातात.

थोडक्यात काय तर तीन महिन्यामध्ये घडून येणाऱ्या शैक्षणिक, सामाजिक घटनांची नोंद या अंकामध्ये घेतलेली असते. असो थांबूया, परवानगी असावी.







दि. २०/१२/२०२५ रोजी कॉलेज ऑफ नॉन-कॉन्हेंशनम व्होकेशन कोर्सेस फॉर वूमेन, कोल्हापूर येथे एक दिवसीयकार्यशाळेच आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे पाहुणे प्राचार्य डॉ. प्रवीण चौगुले, प्राचार्य डॉ. भोसले ए. व्ही, सहा. प्रा. पाटील व्ही. व्ही., सहा. प्रा. गायकवाड एस. एस. उपस्थितीत होते.





दि. ३०/१२/२०२५ रोजी अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन यशवंत शिक्षणशास्त्र महाविद्यालय बी.एड. कॉलेज कोडोली. कार्यशाळा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. भोसले ए. व्ही, सहा. प्रा. पाटील व्ही. व्ही. उपस्थित होत्या.
प्रशिक्षणार्थी १. कुंभार पल्लवी अनिल २. घोलप शिवानी अनिल

# क्षेत्रीय सहभाग सुटे सराव पाठ व शालेय अनुभव कार्यक्रम,

## प्रथम वर्ष द्वितीय सत्र, प्रात्यक्षिक B 2, B 3




## संभाजीराव माने गर्ल्स हायस्कूल, काकासाहेब माने हायस्कूल, रुकडी



## इंदिरा गांधी जयंती

भारताच्या पहिल्या व एकमेव महिला पंतप्रधान म्हणून आपण ज्यांना ओळखतो त्या आपल्या सर्वांच्याच आवडत्या प्रेरणा देणाऱ्या एक अलौकिक व्यक्तिमत्व म्हणून नावारूपास आलेल्या कणखर, धाडसी, निर्णय क्षमता असलेल्या भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांचा जन्म १९/११/१९१७ रोजी अलाहाबाद मध्ये झाला. वडिलांचे नाव पंडीत जवाहरलाल नेहरू, आई कमला नेहरू यांच्या पोटी कन्यारत्न जन्माला आले तिचे नाव प्रियदर्शनी अत्यंत लाजरी बुजरी अबोली म्हणून जिचा परिचय होता तिचे व्यक्तिमत्व असे काही बदलले की ती एक कणखर धाडसी इंदिरा बनली. निर्णय क्षमता अतिउच्च कोटी स्तरावर स्वतःच्या निर्णयावर ठाम राहणारी इंदिरा भारताची पोलादी महिला म्हणून ओळख निर्माण करणारी ज्यांनी पंतप्रधान पद १९६६ ते १९७७ आणि १९८० ते १९८४ पर्यंत दोन टप्यात देशाचे नेतृत्व केले, त्यांनी हरित क्रांती आणि बांगलादेश युध्द यासारख्या महत्वपूर्ण घटनांमध्ये महत्वाची भूमिका बजावली. राजकीय कारकिर्द राज्यसभा सदस्य माहिती व प्रसारण मंत्री म्हणून मंत्रीमंडळात सहभाग. अन्नसुरक्षा सुनिश्चितीत महत्वाचे योगदान. पोखरण अणुचाचणी १९७४ भारताची अणुशक्ती म्हणून ओळख निर्माण करून अनेक मोठे-मोठे धाडसी निर्णय घेण्यात त्यांचा हातखंडा होता. मुलाच्या आकस्मित निधनाने पराजय पदरी आल्याने ही त्या कधीच डगमगल्या नाहीत. त्यांनी स्वतःचे राजकीय कार्य सुरुच ठेवले. अशा या कर्तृत्ववान पोलादी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांची हत्या ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी त्यांच्याच अंगरक्षकांनी केली.


संकलन व लेखन :
छात्राध्यापक : पाटील एस. एस., कुंभार पी. ए.

संपादन : सहा. प्रा. पाटील व्ही. व्ही.
प्राचार्य डॉ. भोसले ए. व्ही.




## महाराणी ताराराणी पुण्यतिथी

ज्यांची ओळख नवशक्ती म्हणून केली जाते त्या म्हणजेच मराठ्यांची ताराराणी म्हणजेच महाराणी ताराबाई. मराठा इतिहासातील सर्वात उल्लेखनीय महिला त्यांचा जन्म १६७५ साली झाला. छ. शिवाजी महाराज यांच्या सूनबाई आणि राजाराम महाराजांच्या पत्नी आणि हंबीरराव मोहिते यांच्या कन्या अशी रणरागिनी जी अनेक संकटे आली तरी शत्रूशी दोन हात करून शत्रुला सळो की पळो करून सोडणारी कोल्हापूरची शान म्हणजे छ. ताराराणी . राजाराम महाराजांच्या निधना नंतर राज्यकारभाराची सर्व सूत्रे हाती घेवून मोगली (मुघल) फौजांना मागे सारण्यासाठी आक्रमक भूमिका घेतली.मराठेशाहीतील मुत्सुधांना काळाचे गांभीर्य समजावून देवून शेवट पर्यंत या सगळ्यांबरोबर एकजुटीने राहून शत्रूला थोपवून धरण्यात यश मिळवले. स्वतः लष्करापुढे येवून लष्कराचा आत्मविश्वास वाढवित मराठ्यांची खालावलेली आर्थिक परिस्थिती उंचावण्यासाठी त्यांनी मोगली मुलुखावर स्वाऱ्या करून आर्थिक बळ वाढवले आणि मराठ्यांची मान उंचावली. करवीर राज्याची म्हणजेच कोल्हापूरच्या राजगादीची स्थापना केली. छ. शिवाजी महाराज व छ. संभाजी महाराज यांच्या मगो त्यांनी समर्थपणे राज्याची धुरा सांभाळली, मोगलांना सळो की पळो करून सोडले. यावेळी संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव यांची साथ मोलाची ठरली. ताराराणी औरंगजेबाच्या सैन्याविरुद्ध उभ्या ठाकल्या त्यावेळी त्यांचे वय २४ ते २५ वर्षे इतकेच लहान होते. या औरंगबेजा-सारख्या मुत्सदी व कपटी सम्राटाशी ताराबाईंनी सलग साडेसात वर्ष लढा दिला. १७०५ साली मोगलांच्या ताब्यातील पन्हाळा किल्ला जिंकून कोल्हापूरला राजधानीचा मान मिळवून दिला. राज्याला गादीला आणि रयतेला समाजाला एक खंबीर नेतृत्व लागते ते ताराराणीं नी दिले. सर्वांचे मनोधैर्य, नितिधैर्य टिकवून ठेवले. मराठ्यांच्या इतिहासातील ताराराणी हे एक ज्वलंत पर्व त्यांनी मुघल सत्तेच्या विरूध्द अनेक लढे दिले. अशा या महाराणी ताराराणी यांचा मृत्यू सिंहगड येथे वयाच्या ८६ व्या वर्षी झाला. त्यांना मानाचा मुजरा.


संकलन व लेखन :
छात्राध्यापक : पाटील निलम, पाटील गौरी


संपादन : सहा. प्रा. पाटील व्ही. व्ही.
प्राचार्य डॉ. भोसले ए. व्ही.


## २४ डिसेंबर -राष्ट्रीय ग्राहक दिन

आधुनिक काळात जगणारा ग्राहक म्हणजे बाजारपेठेचा राजा असतो. आजच्या स्पर्धेच्या युगात तो खरेदी-विक्रीच्या व्यवसायाचा केंद्रबिंदू बनला आहे. भारतात दरवर्षी ग्राहक दिन २४ डिसेंबर रोजी साजरा केला जातो. २४ डिसेंबर १९८६ साली या ग्राहक हक्क कायद्याला राष्ट्रपतीनी मंजूरी दिली होती. तेव्हापासून हा दिवस साजरा होतो. ग्राहकांच्या हक्कांची जाणीव व्हावी हाच उद्देश या दिनाचा आहे. ग्राहक बाजारात खरेदीबाबत व त्या हक्काबाबत जागरूक व्हावा यासाठी हा दिवस महत्वाचा आहे. भारताच्या एक सुजाण नागरिक म्हणून राज्यघटनेने आपणास नागरिकत्वाचे हक्क दिले आहेत त्यातील पहिला आणि सर्वात मोठा हक्क म्हणजे ग्राहकांना दिलेल्या किंमतीच्या समान वस्तू त्यांना मिळणे. वाजवी किंमत आणि शुध्दता या ग्राहकांच्या मुख्य गरजा आहेत ग्राहकांना त्यांचा हक्क मिळावा यासाठी ग्राहक संरक्षण कायदा बनविला आहे. या कायद्यानुसार आता कोणताही ग्राहक अनुचित व्यापाराची नकार करू शकतो. यासाठी त्यांना पूर्ण अधिकार देण्यात आले आहेत. पूर्वीच्या काळी व्यावसायिकांनी व्यवहारात होणारी हेराफेरी लक्षात घेवूनच हा कायदा बनवला आहे. ग्राहकांना त्यांचा हक्क मिळावा यासाठी हा कायदा अंमलात आणला आहे. या कायद्यांतर्गत कोणताही ग्राहक कोणत्याही प्रकारच्या अन्यायकारक व्यापाराची तक्रार करू शकतो. ज्यासाठी त्याला पूर्ण अधिकार देण्यात आले आहेत. पूर्वीच्या काळातील व्यापाराच्या व्यवहाराची हाताळणी लक्षात घेऊनही हा कायदा करण्यात आला. ग्राहकांची होणारी फसवणूक कायद्यामुळे कमी होण्यास मदत झाली. बाजारपेठेतील सर्वात महत्वाचा घटक म्हणजे ग्राहक या ग्राहकाला न्याय मिळवून देणे यासाठी ग्राहक मंच काम करत आहेत. जागो ग्राहक जागो.


संकलन व लेखन :
छात्राध्यापक : कोळी संतोष, माळी जोत्स्ना

संपादन : सहा. प्रा. पाटील व्ही. व्ही.
प्राचार्य डॉ. भोसले ए. व्ही.

## संत गाडगे महाराज पुण्यतिथी

### दि. २०/१२/२०२५

आपली भारतभूमी संत, महात्मे, समाज सुधारकांनी समृध्द आहे. अशाच या संत परंपरेतील एक थोर संत म्हणजे संत गाडगेबाबा त्यांचे संपूर्ण जीवन आपले संपूर्ण आयुष्य जनसेवेसाठी आणि समाजाच्या उन्नतीसाठी वाहिले अशा या संताचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेगांव जवळील शेंगाव (ता. अचलपूर) या गावात झाला. त्यांचे खरे नाव देवराम गंगाराम गाडगे. बालपण अत्यंत गरीबीत गेले. घरच्या हलाखीच्या परिस्थितीने त्यांना शिक्षण घेता आले नाही. पण बालवयापासून त्यांच्या मनात दया, करूणा, परोपकाराची भावना जागी होती. गाडगेबाबांनी सांसारिक जीवन त्यागून संतमार्ग स्विकारला त्यांना लहानपनापासून स्वच्छतेची आवड होती.

संत गाडगेबाबा महाराज हे एक थोर आधुनिक संत, समाजसुधारक, किर्तनकार, अभंग, कुरणे, स्वच्छता, शिक्षण आणि सामाजिक न्यायाचा प्रसार केला. ते स्वतः अतिशय साधे जीवन जगत गावोगावी फिरून झाडू, फावडे, घमेली वावरून गावे स्वच्छ करत समाजात धर्मशाळा, वसतिगृहे, शाळा, रूग्णालये बांधण्यासाठी प्रेरणा देत त्यांचे मुख्य विचारच असे होते की स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यासाठी स्वच्छता हीच खरी सेवा आहे हे पटवून देण्यासाठी ते स्वतः गाव स्वच्छ करत असत. शिक्षणाबाबत ते नेहमीच अग्रेसर राहिले. भारताचा खरा विकास हा शिक्षणामधूनच होतो म्हणून शिक्षण घ्या. सामाजिक न्यायासाठी सतत लढले. जातीभेद, अंध्दश्रध्दा दूर करण्यासाठी सामाजिक एकतेसाठी त्यांनी किर्तने, अभंग यातून समाजाला जागे करण्याच्या प्रयत्न केला. अशा या महान संताचा मृत्यु २०/१२/१९५६ रोजी झाला.


संकलन व लेखन :
छात्राध्यापक : पेरनुले सीमा चंद्रकांत,
वडार श्रीराज भाऊसाहेब

संपादन : सहा. प्रा. पाटील व्ही. व्ही.
प्राचार्य डॉ. भोसले ए. व्ही.

## EPC - 3 अंतर्गत तक्रार निवारण सभा

## EPC - 3



















३ जानेवारी २०२६ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. फोटो पूजन करताना महाविद्यालयाच्या डॉ. भोसले ए. व्ही, सहा. प्रा. पाटील व्ही. व्ही. सर्व बीएड प्रथम वर्ष प्रथम सत्रातील प्रशिक्षणार्थी, सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

८ जानेवारी २०२६ रोजी कै. संभाजीराव बाळासाहेब माने यांच्या स्मृतीदिनानिमित्त फोटोपूजन व मेडिकल कॅम्प चे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. यावेळी सर्व बीएड प्रथम वर्ष प्रथम सत्रातील प्रशिक्षणार्थ्यांची बी. पी., हिमोग्लोबीन, ब्लड ग्रुप व इतर आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयातील प्राचार्य, सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या आरोग्य तपासणी साठी प्राथमिक आरोग्य केंद्र ,रुकडी मधील सर्व अधिकारी, स्टाफ यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.




छ. शिवाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालयामध्ये दि. २३ जानेवारी २०२६ रोजी वसंत पंचमी निमित्त सरस्वती पूजन महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी सर्व बीएड प्रथम वर्ष प्रथम सत्रातील प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. यावेळी सर्व प्राध्यापक उपस्थित होते.



## ११ फेब्रुवारी विविध शैक्षणिक संस्थाना भेटी















# D- 1 शैक्षणिक सहल













## दि. २३/२/२०२६ किल्ले पन्हाळा EPC - 4






## स्वामी विवेकानंद : जीवन, विचार व राष्ट्र उभारणीतील योगदान

स्वामी विवेकानंद हे आधुनिक भारताचे थोर विचारवंत, तत्वज्ञ, समाजसुधारक व युवकांचे प्रेरणास्थत्तन होते. भारतीय संस्कृती वेदांत तत्वज्ञान आणि मानवतावादी दृष्टिकोन जगाच्या समोर प्रभावीपणे मांडणारे ते महान संन्यासी होते. आत्मविश्वास राष्ट्रभक्ती, अध्यात्म आणि सामाजिक सेवा यांचा अद्वितीय संगम त्यांच्या व्यक्तिमत्वात दिसून येतो.

स्वामी विवेकानंद यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी कोलकाता येथे झाला. त्यांचे मूळ नाव नरेंद्रनाथ दत्त होते. त्यांचे वडील विश्वनाथ दत्त हे उद्यशिक्षित वकील होते, तर आई भुवनेश्वरी देवी धार्मिक, सुसंस्कृत व तेजस्वी व्यक्तिमत्वाच्या होत्या. आईकडून त्यांना नमस्कार, श्रध्दा व धैर्य मिळाले तर वडिलांकडून वैज्ञानिक दृष्टीकोन, विवेक व तर्कशक्तीचा वारसा मिळाला.

स्वामी विवेकानंद यांनी संपूर्ण भारतभर भ्रमण करून देशाची सामाजिक, आर्थिक व धार्मिक स्थिती प्रत्यक्ष पाहिली अज्ञान, दारिद्र्य, जातीभेद व अंधश्रध्दा यामुळे देश दुर्बल झाल्याचे त्यांना जाणवले. मानवसेवा हाच खरा धर्म आहे असा संदेश त्यांनी दिला.

स्वामी विवेकानंद हे केवळ संन्यासी नव्हते, तर नवभारताचे शिल्पकार होते. त्यांचे विचार आजही देशाला आत्मविश्वास, एकता आणि मानवतेच्या मार्गावर पुढे नेण्याची प्रेरणा देतात.


संकलन व लेखन :
छात्राध्यापक : स्वाती कांबळे,
चंद्रकला शिंदे

संपादन : सहा. प्रा. गायकवाड एस. एस.
प्राचार्य डॉ. भोसले ए. व्ही.


शिवाजी विदयापिठ कोल्हापूर व तात्यासाहेब कोरे फार्मसी विद्यालय, वारणानगर एक दिवसीय सेमीनार Mentor -Mentee, PARIS PRASH YOJANA Scheme अंतर्गत महाविद्यालयाचा सहभाग




## वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

### नोव्हेंबर

पुजा अजित मोनगुडे - २६/११/१९९७

### डिसेंबर

पल्लवी अनिल कुंभार - ८/१२/२००१
बाहुबली रावसाहेब गोटुरे - ८/१२/१९९४
जुवेरिया मुनीर जमादार - १२/१२/१९९९
आकाशा नामदेव पाटील - १९/१२/१९९१
उदय वामनराव भोईटे ३१/१२/१९९७

### जानेवारी

सचिन बाबुराव शिंदे - १५/०१/१९९३
गौरी कृष्णात पाटील - १६/१/१९८९
शिवानी रूपनर - २९/०१/२००२

### फेब्रुवारी

अब्दुल रहेम पटेल - ०४/०२/२००२
अस्मिता संकल्प पुजारी - १२/०२/१९९९

## - शुभाषितम् -

१) अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम् ।
उदारचरितांना तु वसुधैव कुटुम्बकम् ।।

भावार्थ
हा आपला आणि तो परका अशी भावना ही संकुचित मनाच्या लोकांची असते. उदार मनाच्या लोकांसाठी संपूर्ण पृथ्वी हेच एक कुटुंब असते.

२) उद्योगिनंन पुरूषसिंहमुपैति लक्ष्मी : ।
दैवेन देयमिति कापुरूषा वदन्ति ।।

भावार्थ
परीश्रम मरणाऱ्या सिंहासारख्या पुरूषाकडे लक्ष्मी (समृध्दी) येते. नशीब असेल तर मिळेल असे म्हणने हे भेकड लोकांचे लक्षण आहे.

३) न चोरहार्य न च राजहार्य
न भ्रातृभाज्यं न च भारकारी ।
व्यये कृते वर्धत एव नित्यं
विद्याधनं सर्वधनप्रधानम् ।।

भावार्थ
विद्येचे धन चोर चोरू शकत नाहीत, राजा काढून घेऊ शकत नाही, भावांमधरे वाटले जात नाही आणि ते ओझेही ठरत नाही. खर्च केल्यावर ते वाढतेच म्हणून विद्या हे सर्वश्रेष्ठ धन आहे.

४) क्षमा वीरस्य भूषणम् ।
क्रोधो नरोपस्फीति :।
सत्येन धायते पृथ्वी ।
धर्मो रक्षति रक्षितः ।।

भावार्थ
क्षमाशिलता शूर पुरुषाचे भूषण आहे. राग व्यक्तीला नाशाला नेतो, पृथ्वी सत्यावर टिकून आहे. आणि धर्म रक्षण करण्याचे रक्षण करतो.

५) कमण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोहस्त्वकर्मणि ।।

भावार्थ
तुझा अधिकार केवळ धर्म करण्यावर आहे. फळावर नाही कर्माच्या फळाची अपेक्षा ठेवू नकोस आणि कर्म न करण्यामध्ये आसकती बाळगू नकोस.

- सहा. प्रा. स्वाती गायकवाड

## निसर्ग चित्र

